# दिनांक 04/03/2025

1 खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/03/2025 रोजी 17:00 वा ते दि. 03/03/2025 रोजी 17:00 वा च्या दरम्यान मौजे शिरवली येथील महिला फिर्यादी यांचे घरात ता.खालापुर येथे फिर्यादी यांचे घराचे उघडया खिडकीतुन आत प्रवेश करुन लोखंडी कपाटातुन एकूण 92,000/- रुपये किमतीचे सोन्याचे दागिने व चांदीचे दागिने कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे संमत्तीशिवाय लबाडीचे हेतुने स्व:च्या फायदयाकरीता चोरुन नेले.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.68/2025, भारतीय न्याय संहिता कलम 305 (a) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सफौ/सांगळे हे करीत आहेत

2. गोरेगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक दि. 09/04/2024 रोजी 10:30 वा च्या सुमारास मौजे लोणेरे ता.माणंगाव महिला फिर्यादी या मौजे लोणेरे येथील 06 आरोपीत यांचे मेडीकल समोर फिर्यादी यांचे दुकानाचे गल्लीत आरोपीत नं.01 याने पत्रे का लावले याबाबत फिर्यादी विचारणा करणेस गेले असता या गोष्टीचा मनात राग घरुन आरोपीत 1 वे 6 यांनी सगणमताने अश्लील भाषेत बोलून फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न होइल अशी शिवीगाळी करुन तु कशी दुकान चालवतेस असे बोलुन जिवे ठार मारण्यीच धमकी दिला तसेच आम्ही नावाने बनिया आहोत तु इथे कशी राहते ते बघतो तुला माहीत नाही यापुर्वी मराठी लोकांना पळवुन लावले आहे. अशी धमकी दिली.

याबाबत गोरेगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.16/2025 भा.दं.वि.क.143,147,509,504,506 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोना/मोहिते ह्या करीत आहेत.

3. कोलाड पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/03/2025 रोजी 18:15 वा च्या सुमारास मौजे आंबेवाडी युटु केक शॉप कोलाड, रोहा महिला फिर्यादी हिची मुलगी वय-16 वर्ष ही अल्पवयीन आहे हे माहीत असतांना तिला अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेले.

याबाबत कोलाड पोलीस ठाणे येथे गु.र.नं.16/2025, भारतीय न्याय संहीता 137 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/श्री.देसाई हे करीत आहेत.

4. तळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 01/02/2025 रोजी 19:00 वा ते दि. 02/02/2025 रोजी 19:00 वा च्या सुमारास मौजे वरळ येथील श्री फयाज दाभेळकर यांचे फॉर्महाउस यांचे मिळकतीत ता.तळा येथे बसविण्यात आलेली 16 केव्ही रोहित्र क्र.एच 20149 मधील कोणीतरी

मेन विदयुत वाहक वायर तोडून नटबोल्ड खोलून त्यामध्ये असणारे ऑईल जमिनीवर सांडवून नुकसान करून व त्यामधील तांब्याची कॉईल सुमारे 30 किलो वजनाची कोणीतरी अज्ञात व्यक्तीने स्वतचे फायदयाकरीता लबाडीचे इरादयाने चोरी करून नेली.

याबाबत तळा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.06/2025, BNS 2023 चे कलम 303(2), 324 (4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/रोहेकर हे आहेत

5. तळा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 29/01/2025 रोजी 00:30 वा च्या सुमारास मौजे खांडेखोल येथील श्री यशवंत दत्तात्रेय भिडे व श्री.तलीब मोईज कारा यांचे फार्महाउसचे मिळकतीमध्ये बसविण्यात आलेली रोहित्र(डीपी) क्र.4821240 व श्री तलीब मोईज कारा ता तळा यांचे फार्महाउसचे मिळकतीमध्ये बसविण्यात आलेली 63 केव्ही रोहीत्र डी पी क्र 4804829 कोणीतरी मेनविदयुतवाहक वायर तोडुन नटबोल्ड खोलून त्यामध्ये असणारे ऑईल जमिनीवर सांडवून नुकसान करून व त्यामधील तांब्याची कॉईल सुमारे 70 किलो वजनाची कोणीतरी अज्ञात व्यक्तीने स्वतचे फायदयाकरीता, लबाडीचे इरादयाने आमचे परवानगीशीवाय चोरी करून नेली.

याबाबत तळा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.07/2025, BNS 2023 चे कलम 303(2), 324 (4) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/अविनाश वाघमारे हे आहेत

6. पाली पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 02/03/2025 रोजी 09:30 वा च्या सुमारास मौजे उदधर गावचे हददीत रामेश्वर महादेव मंदिराजवळ असलेल्या पार्किंगमध्ये पळसाचे झाडाखाली, सुधागड येथे फिर्यादी रा. सिरसेवाडी पो.खवली, सुधागड यांच्या मालकीचे होन्डा शाईन कंपनीची एकूण 15,000/-रुपये किमतीची मोटार सायकल क्र.एमएच 06 बीटी 4990 हि कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली.

याबाबत पाली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.15/2025, भा.न्या.सं.2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/रसाळ हे आहेत

7. माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/03/2025 रोजी 16:00 वा च्या सुमारास मौजे निजामपुर मोठा मोहल्ला फिर्यादी यांचा घरासमोर फिर्यादी व आरोपीत क्र 1 व 2 हे नात्याने भाउजय व दिर व पुतण्या आहेत त्यांचे फिर्यादी यांचा घराशेजारील जागेवरून वाद आहेत. फिर्यादी यांचे घरा शेजारील जागेमध्ये साफसफाईचे काम चालु होते. त्या गोष्टीचा आरोपीत क्र 1 याला राग येवुन त्यांनी फिर्यादी यांना शिवीगाळी व दमदाटी केली.यावेळी फिर्यादी या त्यांन समजावण्यास गेल्या असता आरोपीत क्र 1 याने फिर्यादी यांच्या अंगावर धावुन जावुन फिर्यादी यांनी अंगात परीधान केलेली मॅक्सी फाडुन फिर्यादी यांच्या मनास लज्जा उत्पन्न करणारे कृत्य केले . तसेच वरील आरोपीत क्र 1 व तेथे हजर असलेल्या आरोपीत क्र 2 यांनी फिर्यादी यांना हाताबुक्याने मारहाण केली व दमदाटी केली सदर मारहाणीमध्ये फिर्यादी यांच्या गळयातील सोन्याची चैन , कानातील सोन्याची रिंग तुटुन व चष्मा खाली पडुन नुकसान झालेला आहे.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.49/2025, भारतीय न्याय संहिता कलम

74,115(2),131,352,351(2),324(4),3(5), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/किरण तुणतुणे  हे आहेत

8.    माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 03/03/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे विळे गावचे हददीत चंद्रकांत मोहिते यांचे चहा टपरी जवळ ता.माणगाव येथे अरोपीत रा.साजे आदिवाशी वाडी तर माणगाव याने जुन्या वादाचा राग मनात धरुन फिर्यादी रा.विळा आदिवाशी वाडी ता.माणगांव यांना शिवीगाळी व दमदाटी करुन चाकुने ,बगलेवर व उजव्या हाताला दुखापत केली.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.50/2025,भारतीय न्याय संहिता कलम 118(1),115(2),352,351(2),  प्रमाणे प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/राठोड  हे आहेत

## वाहतूक केसेस

दिनांक 03.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 245 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 2,57,300/-रुपये इतका दंड आकारला आहे.